प्रकरण - १७

# जागतिकीकरण आणि भारत

## (Globalisation and India)

या पूर्वीच्या प्रकरणात आपण भारताला आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम का स्वीकारावा लागला याचा अभ्यास केला. त्याचप्रमाणे हा नवीन आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम राबविताना देशात सार्वजनिक क्षेत्राचे असणारे महत्त्व कसे कमी करावे लागले, तसेच उद्योग, व्यापार इत्यादीवर असलेली बंधने दूर करण्याचे निर्णय का घ्यावे लागले हे अभ्यासले. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करायचा असेल तर खाजगीकरण, उदारीकरण याला कसे प्राधान्य द्यावें लागते हेदेखील अभ्यासले. या प्रकरणात जागतिकीकरणाचा अभ्यास करणार आहोत.

गेल्या काही वर्षांत भारतासह जगातील अनेक राष्ट्रांत जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांच्या संबंधात विचारमंथन चालू आहे. १९९४ मध्ये उरूग्वे येथे राष्ट्राराष्ट्रांतील व्यापाराविषयक वाटाघाटी पूर्ण झाल्यावर १९९५ मध्ये 'जागतिक व्यापार संघटना' (World Trade Organisation, W.T.O.) ची स्थापना करण्यात आली. या राष्ट्रात भारतदेखील सामील असल्याने जागतिक मुक्त व्यापराचे किंवा जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाले याचा अभ्यास करू. तत्पूर्वी जागतिकीकरणाची संकल्पना समजावून घेऊ.

**जागतिकीकरणाचा अर्थ** :

जागतिकीकरणाचा अर्थ वेगवेगळा लावला जातो; परंतु सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास जागतिकीकरण म्हणजे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थकारणाशी संलग्न करणे, जोडून देणे होय. असे असले तरी जागतिकीकरणासंबंधी विविध अथतज्ज्ञांनी दिलेल्या व्याख्या अभ्यासणे उपयुक्त ठरते. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) **रुसी मोदी** यांच्या मते जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढवणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे होय.

२) **सी. टी. कुरियन** यांच्या मते विविधता असलेल्या अर्थव्यवस्थेचा समूह होय. परस्परातील व्यवहारातून आणि वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेतून कालांतराने एक वैशिष्ट्यपूर्ण अर्थव्यवस्था अस्तित्वात येते; त्यास जागतिकीकरण किंवा जागतिक अर्थव्यवस्था म्हणतात.

३) **जागतिक बँक** : जागतिक बँकेने, जागतिकीकरणाचा अर्थ पुढीलप्रमाणे लावला आहे.



जागतिककरण म्हणजे -

* उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध हळूहळू रद्द करणे.
* आयातीचे दर कमी करणे.
* सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगीकरण करणे.

४) श्रमवण कुमारसिंग यांच्या मते, जगातील सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधन सामग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेने परिचलन निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

वरील सर्व व्याख्या अभ्यासल्यावर जागतिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये निर्माण होतात.

* जागतिकीकरणात मुक्त स्पर्धा असते.
* जागतिकीकरणात सरकारी नियंत्रणे रद्द केली जातात.
* जागतिकीकरणात सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण केले जाते.
* जागतिकीकरणात आयातीवरील निर्बंध हळूहळू रद्द केले जातात.
* जागतिकीकरणात संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण केली जाते
* जागतिकीकरणात भांडवल व साधन सामग्रीत गतिशीलता निर्माण केली जाते.
* जागतिकीकरणात मुक्त स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता व उत्पादन वाढविले जाते.

वरील सर्व वैशिष्ट्ये आणि व्याख्या अभ्यासल्यावर असे म्हणता येईल की, अर्थव्यवस्थेला बंदिस्ताकडून मुक्ततेकडे नेणारे आर्थिक धोरण म्हणजेच जागतिकीकरण होय.

**जागतिकीकरणाचे भारताच्या दृष्टीने फायदे** :

भारताने जागतिकीकरणाच्या धोरणाचा कार्यक्रम अमलात आणण्याचे ठरविल्यास भारताला सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करावे लागेल, भारतात परकीय गुंतवणुकीस मान्यता द्यावी लागेल, आयातीवरील बंधने दूर करावी लागतील, परकीय चलनावर नियंत्रण ठेवणारे फेरा (FERA) सारखे कायदे रद्द करावे लागतील. तसेच निर्यात वाढीसाठी विनिमय दरात सुधारणा करावी लागेल. या गोष्टींची पूर्तता केली तरच जागतिकीकरणाचा लाभ भारताला होऊ शकेल. जागतिकीकरणापासून भारताला कोणते फायदे मिळू शकतील, ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करता येईल** : जागतिकीकरणामुळे भारताला आपल्यात असणाऱ्या उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करता येण्याची शक्यता आहे. जागतिकीकरणामुळे उत्पादित वस्तूंची मागणी वाढेल. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढवावे लागेल. परिणामी असलेल्या उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करता येईल.

२) **नव्या तंत्रज्ञान हस्तांतराचा लाभ घेता येईल** : जागतिकीकरणामुळे नवे

तंत्रज्ञान हस्तांतराचा फायदा भारतात होऊ शकेल. जगातिल विविध राष्ट्रांत, विविध प्रकारचे शोध लागत असतात. नवे तंत्रज्ञान, उत्पादन पद्धती, नवे उत्पादन, विकसित होत असते. जागतिकीकरणामुळे हे नवे तंत्रज्ञान एका राष्ट्रातून दूसऱ्या राष्ट्रात सहज जाऊ शकते. त्यामुळे विकसनशील राष्ट्राचा विकास जलद गतीने होतो.

**३) विविध प्रकाच्या बचती मिळतात** : जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विविध प्रकारच्या बचतींचा (Economies) लाभ मिळू शकेल. उत्पादन शक्तीचा पुरेपूर वापर केल्याने उत्पादनात वाढ होईल, त्यामुळे विविध प्रकारच्या बचतींचा, फायद्यांचा लाभ उत्पादकांना होईल. त्याचा परिणाम उत्पादन खर्च कमी होण्यात व किमती कमी होण्यात होतो.

**४) उद्योगातील कार्यक्षमतेत वाढ** : जागतिकीकरणामुळे कुशल व्यवस्थापक, कार्यक्षम तंत्रज्ञ भारतात येतील. त्याचा परिणाम भारतीय उद्योगातील कार्यक्षमता, उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

**५) परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होईल** : जागतिकीकरणामुळे स्वदेशी उत्पादकांना, परदेशी उत्पादकांशी स्पर्धा करावी लागेल. त्यामुळे स्वदेशी उत्पादक आपला उत्पादन खर्च कमी करण्याचा, दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या या प्रयत्नामुळे निर्यात वाढीला चालना मिळेल. परिणामी परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होईल. तसेच भारतात परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढेल. त्याचा लाभ भारतीयांना मिळू शकेल.

जागतिकीकरण केल्याने भारताचा मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकेल हे निश्चित; परंतु भारताचे विविध वस्तूंचे उत्पादन करताना कोणत्या उत्पादन क्षेत्राचा फायदा आहे हे पाहावे लागेल. जसे औषध निर्मिती क्षेत्र, वस्त्रोउद्योग क्षेत्र, कृषीक्षेत्र इत्यादी क्षेत्रात भारताची मोठ्या प्रमाणावर निर्यात क्षमता आहे. त्यात भरीव वाढ केली पाहिजे. त्यासाठी निर्यातीवरील नियंत्रणे कमी करणे, जकात दरात कपात करणे, उत्पादकतेत वाढ करणे, मालाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे.

सध्याच्या काळात माहिती तंत्रज्ञान व दळणवळण क्षेत्रात क्रांतिकारक बदल होत आहेत. या तंत्रज्ञानामुळे जग लहान झाले आहे. जग जवळ आले आहे. त्यामुळे भारताला या नव्या वातावरणापासून दूर राहणे परवडणारे नाही.

असे असले तरी जागतिकीकरणाचे काही तोटेही भारताच्या दृष्टीने संभवतात. जागतिकीकरण केल्यास भारत कर्जाच्या विळख्यात गुंतण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. कारण जागतिकीकरणाने आयतीत वाढ होईल. परिणामी परकीय कर्ज परत करण्यासाठी कर्जे काढावी लागतील. त्यामुळे कर्जाच्या विळख्यात राष्ट्र सापडेल. तसेच जागतिकीकरणामुळे भारतीय उद्योग परकीय उद्योगाच्या स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. त्याचा परिणाम भारतीय उद्योगाच्या वाढीवर प्रतिकूल होईल. एवढेच



नव्हे तर जागतिकीकरणाची प्रक्रिया राबवितांना आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी, वीज या सारख्या मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. या सोयीशिवाय विकासाची प्रक्रिया गतिमान होत नाही. भारताने जागतिकीकरणाची कल्पना स्वीकारल्यावर भारतात मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक होणे आवश्यक आहे; परंतु भारतातील नोकरशाही वृत्ती, दफ्तर दिरंगाई, सरकारी नियंत्रणे, भ्रष्टाचार, राजकीय अस्थिरता इत्यादीमुळे गुंतवणुकीस अडथळे निर्माण झालेले आहेत. जागतिकीकरणाने नवे तंत्रज्ञान उपयोगात आणले जाणार असल्याने बेकारीदेखील वाढणार आहे, असे भारतीय कामगार संघटनेला वाटते. अशा प्रकारचे दोष जागतिकीकरणात आढळत जरी असली तरी अर्थव्यवस्था सुधारणा करण्यासाठी, उत्पादन वाढ, उत्पादकता, गुणवत्ता वाढीसाठी, उत्पादन घटक, तंत्रज्ञान, यांचे स्थानांतर करण्यासाठी, तसेच त्यांच्यात गतिशीलता निर्माण करण्यासाठी, जागतिकीकरण आवश्यक समजले जाते.

**आर्थिक सुधारणेनंतर भारतातील अर्थव्यवस्था** :

१९९१-९२ मध्ये भारताने आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमास सुरुवात होऊन जवळजवळ दहा वर्षे होत आली आहेत. तेव्हा या दहा वर्षांच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारली का बिघडली या संबंधीची माहिती पाहणे आवश्यक ठरते. गेल्या दहा वर्षात या आर्थिक सुधारणांचे भारतीय अर्थव्यवस्थेवर पुढील परिणाम दिसून आले.

**१) स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ** : आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतल्यापासून भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली आहे. तक्ता क्र. १७.१ वरून हे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. १७.१**

| वर्ष | स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर | वर्ष | स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर |
|---|---|---|---|
| १९८९-९० | ६.५ | १९९६-९७ | ७.५ |
| १९९०-९१ | ५.२ | १९९७-९८ | ५.९ |
| १९९१-९२ | १.५ | १९९८-९९ | ६.८ |
| १९९२-९३ | ४.५ | १९९९-२००० | ६.४ |
| १९९३-९४ | ६.० | २०००-०७ | ७.८ |
| १९९४-९५ | ७.० | २००७-१२ | ७.० |
| १९९५-९६ | ७.३ | | |

Source : RBI Hand book of Statistics on Indian Economy (2000, 11-12)

१९९१-९२ या वर्षात राष्ट्रीय उत्पादन वाढीचा सरासरी दर फारच कमी म्हणजे १.५% होता. या काळात भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती बिघडलेली होती. १९९२-

९३ या काळात मात्र स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सरासरी ४.५ टक्क्याने वाढ झाली. १९९२-९३ ते ९७-९८ या काळात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सरासरी वाढ ७% ने झाली असे दिसून येते. आठव्या योजना काळात (१९९२-९७) स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा वार्षिक दर ६.८% एवढा गृहीत धरला होता; परंतु आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली. (१९९४-९५ ते १९९७-९८) या काळात राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर सरासरी ७% एवढा राहिल्याचे दिसून येते. सन २००२-०७ या काळात हा दर ७.८% राहिला तर २००७-१२ या काळात तो ७ टक्के होता.

**२) भाववाढीवर नियंत्रण** : आर्थिक सुधारणेच्या कार्यक्रमामुळे सरकारला भाववाढीवर नियंत्रण ठेवता आले. १९९४ नंतर घाऊक किमतीचा निर्देशांक १०% पेक्षाही कमी झाला. त्याचप्रमाणे १९९५-९६ या वर्षी तो ५.१% ने कमी झाला. १९९७-९८ नंतर मात्र यात जलद गतीने घट झाली. १९९९ मध्ये घाऊक किमतीचा निर्देशांक ३% पेक्षाही कमी झाला. सध्याच्या काळात घाऊक किमतीचा निर्देशांक ६% च्या जवळपास आहे. तथापि, मागील काही वर्षात भाववाढ झपाट्याने होत आहे.

**३) बचत गुंतवणुकीवर परिणाम** : आर्थिक सुधारणेच्या कार्यक्रमानंतर स्थूल देशांतर्गत बचती व गुंतवणूक यात फारशी वाढ झाली नाही. १९९०-९१ या काळात स्थूल देशांतर्गत बचती, या स्थूल उत्पनाच्या २४.३% एवढ्या होत्या. १९९५-९६ मध्ये या बचतीत २५.६% ने वाढ झाली. याच काळात गुंतवणूक स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या २७.७% वरुन २७.४% एवढी झाली. याचाच अर्थ गुंतवणुकीत अल्पशी घट झाली. वेगळ्या शब्दात गुंतवणुकीची स्थिती समाधानकारक नाही. तथापि, देशांतर्गत बचतींचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे प्रमाण दहाव्या योजनेत ३०.६% होते. अकराव्या योजनेत ते ३४.८% झाले. गुंतवणूकदराचे प्रमाण अनुक्रमे ३२.१% आणि ३६.७% होते.

**४) वित्तीय तूट कमी करण्यात अपयश** : सरकारने १९९१ मध्ये आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम अमलात आणण्याचे ठरवले. हा कार्यक्रम अमलात आणण्यापूर्वी केंद्र सरकारच्या महसुली तुटीचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण सरासरीने वार्षिक ३% पेक्षाही कमी होते. नंतर त्यात वाढ होऊन ती ३% पेक्षा अधिक झाले. असे होण्याचे कारण महसुली तुटीचे नियंत्रण योग्य प्रकारे होऊ शकले नाही. त्याचप्रमाणे व्याजाच्या दरात झालेली वाढ हे एक कारण सांगता येते. राजकोषीय तुटीच्या बाबतीत असे दिसून येते की, १९९०-९१ मध्ये ही तूट राष्ट्रीय उत्पन्नच्या ८.३% होती. ती १९९५-९६ मध्ये ६.१% एवढी झाली. याचाच अर्थ आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर सरकारला वित्तीय तूट कमी करण्यात फारसे यश आले नाही. सन २०११-१२ मध्ये ही तूट ५.१% इतकी होती.



**५) व्यवहारतोलातील तूट** : परदेशी व्यापाराच्या ताळेबंदातील तूट कमी करणे हे आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचे एक उद्दिष्ट होते. आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे निर्यातीत ७५.६% तर आयातीत ४८.६% ने वाढ झाली. आयातीपेक्षा निर्यातीत अधिक वाढ होती. त्याचप्रमाणे सरकारच्या या कार्यक्रमामुळे व्यापारशेषातही सुधारणा झाली. १९९०-९१ मध्ये व्यापारशेष ९४ अब्ज डॉलरने प्रतिकूल होता. १९९४-९५मध्ये व्यापारशेषातील प्रतिकूलता कमी होऊन ती ८.९ अब्ज डॉलर एवढी झाली. ताळेबंदाच्या चालू खात्यावरील भांडवली तूट, भांडवली खात्यावरील वाढाव्याने भरून काढण्यात आली. १९९१-९२ ते १९९४-९५ या काळात भांडवली खात्यावरील वाढावा चालू खात्यावरील तुटीपेक्षा जास्त झाल्याने राखीव निधीत वाढ झाली. भारताच्या विदेशी गंगाजळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सन २००९-१० मध्ये व्यवहारतोलातील तूट १, १८, ३७४ कोटी रुपयांची होती.

**६) विदेशी व्यापारात वाढ** : सरकारच्या आर्थिक सुधारणेच्या कार्यक्रमामुळे भारताच्या विदेशी व्यापारात वाढ झाली असे दिसून येते. जागतिक विकास अहवाल (२०००-०१) (World Development Report 2000-01) यामध्ये दिलेल्या माहितीनुसार, जागतिक निर्यातीत १९९५ मध्ये भारताचा ०.५९% वाटा होता तो २००८ मध्ये ०.९९% एवढा झाला. याच काळात भारताच्या निर्यातीत ८७% ने वाढ झाली. १९९५ मध्ये भारताची निर्यात ४०.६९ बिलीयन डॉलर होती. ती २००८ मध्ये २८०.३ बिलियन डॉलर एवढी झाली. असे असले तरी या काळात जागतिक निर्यातीच्या हिश्श्यात मात्र कोणताच बदल झाला नाही. तक्ता क्र. १७.२ वरून भारताच्या जागतिक व्यापारात इतर देशांशी तुलना करता, हिस्सा बदल झाला किंवा नाही याची कल्पना येते.

**तक्ता क्र. १७.२**

| देश | निर्यात अमेरिकन डॉलर द. ल. | | % जागतिक निर्यात | | % ने वाढ १९९५ |
|---|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००८ | १९९५ | २००८ | २००८ |
| भारत | ३०,६३० | १,७६,८५८ | ०.५९ | १.१० | १४.४३ |
| चीन | १,४८,७८० | १४,२८,५४६ | २.८८ | ८.९१ | १९.० |
| मेक्सिको | ७९,५४२ | २,९१,८०७ | १.५४ | १.८२ | १०.५ |
| द. कोरिया | १,२५,०५८ | ४,२२,००७ | २.४२ | २.६३ | ९.८ |
| ब्राझील | ४६,५०६ | १,९७,९४२ | ०.९० | १.२३ | ११.८ |
| जागतिक निर्यात | ५१,७२,०६० | १,६०,२६,४५४ | १००.० | १००.० | ९.१ |

**७) रोजगार** : आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर रोजगारीत वाढ झाली किंवा नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरते. १९८३ मध्ये ३०२६ लाख लोकांना रोजगार मिळाला होता तो

१९९०-९१ मध्ये ३५६८ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर १९९४ मध्ये त्यात वाढ होऊन तो ३७४ लाख एवढा झाला. तक्ता क्र. १७.३ वरून हे स्पष्ट होते. १९८३ आणि १९९४ या काळात रोजगार निर्मितीचा वार्षिक दर २.०४ एवढा होता. हा दर श्रम पुरवठ्याच्या दराबरोबर होता. हा दर पुढील दहा वर्षे कायम राहिला तर देशाला बेरोजगारांच्या मागे राहिलेली संख्या (Back log) कमी होऊ शकेल असे तज्ज्ञांना वाटते; परंतु आर्थिक सुधारणेच्या कार्यक्रमात म्हणजे १९९४ ते २००० या काळात रोजगार वाढीचा दर केवळ ०.९८ टक्के एवढाच होता. आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम संघटित कार्यक्रम क्षेत्रातच आणि संयुक्त क्षेत्रामध्ये (Corporate Sector) राबविला गेल्याने १९९४ ते २००० या काळात तो कमी होऊन ०.५३% एवढाच राहिला. आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यापूर्वी म्हणजेच १९८३-९४ या काळात तो ७% राहील असा अंदाज केला होता. त्याचप्रमाणे संघटित क्षेत्रातही १९९४ ते २००० या काळात रोजगारात केवळ ९.०२% ने वाढ झाली. आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे रोजगारात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली नाही. त्यामुळे दारिद्र्यातही घट होऊ शकली नाही.

**तक्ता क्र. १७.३**

**१९८३ ते १९९७ या काळातील रोजगारातील बदल**

| वर्ष | एकूण | संघटित क्षेत्र | असंघटित क्षेत्र |
|---|---|---|---|
| १९८३ | ३०२६.०० | २४०.१ | २७८५.९ |
| १९९४ | ३७४.०० | २७.३७ | ३४८.०८ |
| १९९९-२००० | ३९७.०० | २८.११ | ३६८.८९ |
| रोजगारवाढीचा वार्षिक दर (शे.) | | | |
| १९८३ ते १९९४ | २.०४ | १.२० | २.०१ |
| १९९४ ते २००० | ०.९८ | ०.५३ | १.०२ |

Source : House Hold Consumption Survey, NSSO, G.O.

**८) आर्थिक सुधारणा व शेती** : आर्थिक सुधारणा कार्यक्रमाने शेती विकासाकडे दुर्लक्ष केले असे दिसून येते. १९८०-८१ मध्ये अन्नधान्य उत्पादन १२९.६ द.ल. टन होते, तर १९९०-९१ मध्ये ते १७६.४ द.ल. टन एवढे होते. या काळात अन्नधान्य वाढीचा वार्षिक दर ३.१% एवढा होता, परंतु आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर म्हणजे १९९०-९१ ते २०००-०१ या काळात अन्नधान्याच्या उत्पादनात फारशी वाढ झाली नाही. १९९०-९१ मध्ये १७६.४ द.ल. टन अन्नधान्याचे उत्पादन होते, तर २०००-०१ मध्ये ते २०२.५ द.ल. टन एवढे झाले. याचाच अर्थ अन्नधान्य वाढीचा वार्षिक दर २.८ % एवढा होता. अन्नधान्य वाढीचा दर कमी होण्याचे कारण सुधारणा कार्यक्रमाने केवळ निर्मिती (Manufacturing) आणि सेवा क्षेत्रावरच फक्त लक्ष केंद्रित केले होते.



त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीपेक्षा सरकारची कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी करण्यात आली. त्याचप्रमाणे नाबार्डने आधारभूत संरचना आणि विकास निधीसाठी १३५०० कोटी रुपय जमा केले; परंतु त्यातील फक्त ३५% निधी कृषिविकासासाठी खर्च करण्यात आले. कृषिक्षेत्राच्या विकासासाठी, खाजगीक्षेत्र सिंचन योजनावर खर्च करेल अशी अपेक्षा होती; परंतु तसे झाले नाही. बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश या राज्यात अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर फारच कमी होता. त्याचप्रमाणे हरितक्रांती झालेली राज्ये, पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यांनी उत्पादनाची एक स्थिती गाठली असल्याने उत्पादन वाढले नाही. सरकारला मागास भागात अन्नधान्य उत्पादनात वाढ करता आली नाही. एवढेच नव्हे तर आर्थिक कार्यक्रमानुसार शेती व्यवसायात दिली जाणारी अनुदाने (जसे खते, बियाणे, वीज इत्यादीवर दिलेली अनुदाने) कमी केल्याने उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. शेती उत्पादन ३.८%वरून २.३% ने कमी झाले. अन्नधान्याचे उत्पादन कमी झाले; परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भार मात्र कमी झाला नाही.

आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांत घट झाली आहे. आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी १९८३ मध्ये दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या जे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण ४४.४९% होते तर १९९०-९१ मध्ये हे प्रमाण ३५.११% होते. १९९३ मध्ये ३२३ द.ल. लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. १९९१ मध्ये त्यांची संख्या २९१ द.ल. होती; परंतु त्यानंतर २००४-०५ मध्ये हे प्रमाण ३५.१% वरून ३७.२% ने वाढले. याचाच अर्थ आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर दारिद्र्याखाली राहणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली नाही.

**९) आर्थिक सुधारणा आणि कामगार** : आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी म्हणजे १९८१ ते ९० या काळात २१६४ संप व १८५७ टाळेबंदी होऊन ४०२.५ द.ल. एवढे कामगारांचे कामाचे दिवस वाया गेले. आर्थिक सुधारणेनंतर म्हणजेच १९९१ ते २००८ या काळात ६०७७ संप, ४०२३ टाळेबंदी होऊन ३३२.६ द.ल. एवढेच कामाचे दिवस वाया गेले. याचाच अर्थ आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर संप व टाळेबंदीत घट झाली. औद्योगिक संबंधात सुधारणा झाली. संप आणि टाळेबंदीचे प्रमाण कमी होण्याचे कारण म्हणजे खाजगी आणि उदारीकरणामुळे मालकवर्गात आक्रमकता वाढली. कामगार वर्गांना नमविण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीत वाढ झाली. कामगारांसंबंधी ते ताठर धोरण स्वीकारू लागले. तसेच याच काळात १६८७ उद्योग बंद पडल्याने १.२० लाख कामगार बेकार झाले. मालकवर्गाने उद्योग बंद केले. त्याचप्रमाणे त्याच प्रकारचा उद्योग दुसरीकडे सुरू करून कायमस्वरूपी कामगारांनाही कामावरून कमी केले. एवढेच नव्हे तर कामगारांना ले ऑफ देऊन खर्च वाचविण्याचा प्रयत्न सुरू

केला. १९९१-९२ या काळात ४.९१ लाख कामगारांना ले ऑफ देण्यात आला आणि २०७.२० लाख कामगारांना कामावरून कमी केले; परंतु रोजदारीवर कामगार नेमणे मालकवर्गाला फायद्याचे असल्याने मोठ्याप्रमाणात त्यांची भरती करण्यात आली.

**१०) आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि औद्योगिक प्रगती** : आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा मुख्य हेतू औद्योगिक उत्पादनातील अडथळे दूर करणे हा होता. औद्योगिक उत्पादनात वाढ व्हावी यासाठी १८३ उद्योग परवानामुक्त करण्यात आले. त्यानंतर सरकारने अनेक उद्योग परवानाविरहित केले. १९९८-९९ मध्ये कोळसा, लिग्नाईट, पेट्रोलियम, साखर उद्योग परवानाविरहित करण्यात आले. सध्याच्या धोरणात केवळ सहा उद्योगांना परवाना द्यावा लागतो. वास्तविक, औद्योगिक प्रगतीत परवाना (Licence) हा अडथळा होता. तो सरकारने आर्थिक सुधारणा कार्यक्रमाद्वारे रद्द केला. तक्ता क्र. १७.४ वरून असे दिसून येते की, १९८१-८२ ते १९९०-९१ औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ७.८% होता. १९९०-९१ ते १९९८-९९ मध्ये कमी होऊन ५.९% एवढा झाला.

**तक्ता क्र. १७.४**

**औद्योगिक उत्पादनाचा वार्षिक सरासरी दर**

| | क्षेत्र | १९८१-८२ ते १९९०-९१ | १९९१-९२ ते १९९८-९९ | २०१० ते २०११ |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण निर्देशांक | ७.८ | ५.८ | ८.२ |
| २ | उत्पादन क्षेत्र | ७.६ | ५.९ | ९.० |
| ३ | वीज | ९.० | ६.८ | ५.५ |
| ४ | खाणी व खनिजे | ८.३ | ३.० | ५.२ |

उत्पादन किंवा निर्मिती क्षेत्राचा दर ७.६% वरून ५.९% एवढा झाला. वीज, खाणी व खनिजे यांचा विचार करता हा दर अनुक्रमे ९% वरून ६.८ व ८.३% वरून ३% एवढा झाला. यावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे औद्योगिक उत्पादनात वाढ होऊ शकली नाही. तथापि, २०१०-११ मध्ये औद्योगिक उत्पादनाच्या वार्षिक दरात वाढ झाल्याचे दिसते.

**११) आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि सार्वजनिक क्षेत्र** : आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा परिणाम म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात, नफ्यात वाढ होण्याची प्रवृत्ती दिसून येऊ लागली. १९९३-९४ या काळात या क्षेत्राचा नफा ११.६१% होता. तो २००९-१० मध्ये १७.६% झाला. त्याचप्रमाणे निव्वळ नफ्यातही वाढ होण्याची प्रवृत्ती आढळते. १९९३-९४ मध्ये निव्वळ नफा २.८४% होता. तो २००९-१० मध्ये ८.७% एवढा झाला. आर्थिक सुधारणा कार्यक्रमात, केंद्र सरकारच्या मालकीचे जे उपक्रम होते त्यांची कामगिरी चांगल्या प्रकारची होती. असे असताना या क्षेत्रातील



भांडवल काढून घेण्याचा निर्णय सरकारने का घेतला असा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक, चांगली कामगिरी करणाऱ्या उद्योगांना उत्तेजन देऊन त्यांच्याकडून अधिक चांगली कामगिरी करून घेणे योग्य ठरले असते.

१९९७-९८ पर्यंत सरकारने १०८ सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांशी सामंजस्य करार करून ज्ञापनावर (Memorandum of Understanding) सही केली. यापैकी ४४५ उपक्रमांची कामगिरी उत्कृष्ट होती. २५ उपक्रमांची अति उत्तम आणि १९ उपक्रमांची कामगिरी चांगली होती. तेव्हा १०८ उपक्रमांपैकी ८९ उपक्रमांची कामगिरी चांगली असेल तर त्यांना सुधारणेची संधी का देऊ नये, असा प्रश्न निर्माण होतो.

**१२) आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि अपगुंतवणूक** : सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील अपगुंतवणुकीची प्रक्रिया १९९१-९२ मध्ये सुरू झाली. अपगुंतवणुकीचा मुख्य हेतू केंद्र सरकारची वित्तीय तूट कमी करणे हा होता. (Fiscal Deficit) अपगुंतवणुकीसाठी जे उपक्रम फायद्यात चालतात त्यांची निवड सरकारने केली आणि अशा उद्योगाचे समभाग अत्यंत कमी किमतीला विकले अशी टीका केली जाते. १९९१-९२ मध्ये ज्या सार्वजनिक उपक्रमातील भांडवलाचे अपगुंतवणूक करण्याचे ठरविले होते, त्यांचे मूल्य ६४८० कोटी रुपये होते. अपगुंतवणुकीद्वारे सरकारला केवळ ३०३८ कोटी रुपयेच प्राप्त झाले. याचाच अर्थ सरकारला या उपक्रमातील समभागांची विक्री करून ३४४२ कोटी रुपयांचा तोटाच सहन करावा लागला. १९९१-९२ ते १९९८-९९ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील समभागांची विक्री करून सरकारला १८६९८ कोटी रुपये मिळाले. ही रक्कम अपगुंतवणूक केलेल्या उद्योगातील एकूण गुंतवणुकीच्या केवळ ८.४% एवढीच होती. १९९६ मध्ये सरकारने जी. व्ही. रामकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पाच सभासदांची अपगुंतवणूक किंवा निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना केली. या आयोगाने ४३ उद्योगांचा निर्गुंतवणुकीसाठी समावेश केला. या उद्योगांची विक्री वाढविण्याची शिफारस केली आहे. १९९८ मध्ये आणखी १०३ उद्योगांची निर्गुंतवणूक करण्याची शिफारस केली आहे. सन २००० मध्ये १३०० कोटी रुपये तोटा असलेल्या एअर इंडियाचे खासगीकरण करण्याची शिफारसही आयोगाने केली आहे.

सन २०१०-११ मध्ये अपगुंतवणुकीतून ४०,००० कोटी रुपये प्राप्त करण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात सरकारला २२,७६२ कोटी रुपये मिळाले. १९९१-९२ ते २०१०-११ या काळात एकूण ९९७३८ कोटी रुपये अपगुंतवणुकीतून मिळाले.

**१३) आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि परकीय गुंतवणूक** : आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा प्रमुख हेतू भारतात परकीय गुंतवणुकीला आकर्षित करणे हा होता. १९९२ मध्ये १७८१ द.ल. डॉलर, १९९५ मध्ये ११२४५ द. ल. डॉलर, तर १९९८ मध्ये १५७७२ द. ल. डॉलरच्या गुंतवणुकीला सरकारने मान्यता दिली; परंतु

प्रत्यक्षात मात्र या गुंतवणुकीचे प्रमाण फारच कमी होते. १९९२ मध्ये गुंतवणुकीचे प्रमाण १३% तर १९९५ मध्ये २२% एवढेच होते. तक्ता क्र. १७.५ वरून परकीय गुंतवणुकीसाठी सरकारची परवानगी आणि प्रत्यक्षातील परकीय गुंतवणूक यात किती फरक होता याची कल्पना येते. १९९१ ते १९९८ या काळात ५५१११ द. ल. अमेरिकन डॉलर गुंतवणुकीस मान्यता मिळाली; परंतु प्रत्यक्षात ११९६३ द. ल. अमेरिकन डॉलरची गुंतवणूक भारतात झाली. परकीय गुंतवणुकीत वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक ठरते.

**तक्ता क्र. १७.५**

**प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक : प्रत्यक्षातील आणि मान्यता**

| वर्ष | अमेरिकन डॉलर मिलियन (द. ल.) | | |
|---|---|---|---|
| | मान्यता | प्रत्यक्षात | टक्केवारी |
| १९९१ | ३२५ | १५५ | ४७.७ |
| १९९२ | १७८१ | २३३ | १३.१ |
| १९९३ | ३५५९ | ५७४ | १६.१ |
| १९९४ | ४३३२ | ९५८ | २२.१ |
| १९९५ | ११२४५ | २१०० | १८.७ |
| १९९६ | १११४२ | २३८३ | २१.४ |
| २०००-०१ | – | ४०२९ | ५९.३ |
| २०१०-११ | – | ३०३८० | ४९.१ |

Source : Govt. of India Economic Survey 1999-2000

सन १९९१ मध्ये १५५ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक झाली. सन २०१०-११ मध्ये ६१८५१ द.ल. अमेरिकन डॉलरची गुंतवणूक झाली. त्यापैकी ३०३७ बिलियन अमेरिकन डॉलरची गुंतवणूक प्रत्यक्ष गुंतवणूक होती (४९.१%), तर ३१४७१ बिलियन अमेरिकन डॉलरची विविध विभागात / खात्यात गुंतवणूक होती. एकूण गुंतवणुकीच्या ५०.९% एवढी होती. इतर देशाशी तुलना करता भारतात परकीय भांडवल आकर्षित करण्यास फारसे यश मिळाले नाही.

**१४) आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि प्रादेशिक विषमता :** आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा हेतू प्रादेशिक विषमता कमी करणे हा होता. आर्थिक सुधारणा कार्यक्रम १९९१ मध्ये लागू झाला. या कार्यक्रमात सरकारने मागास भागाचा विकास साध्य करण्याचे ठरविले; परंतु विकसित भागात आधारभूत संरचना उपलब्ध असल्याने या विभागाकडेच मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित झाली. आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा विविध राज्यावर काय परिणाम झाला हे पाहणे योग्य ठरते. १९८०-८१ मध्ये पंजाब दरडोई महत्तम उत्पन्न (कमाल) आणि बिहारमधील दरडोई कमीत कमी



(किमान) उत्पन्न यांच्यातील प्रमाण २-९ एवढे होते. या प्रमाणात १९९०-९१ मध्ये अल्पशी वाढ होऊन ते ३.१ एवढे झाले. १९९६-९७ मध्ये त्यात आणखीन वाढ होऊन ते ४.७ एवढे झाले. यावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक सुधारणेमुळे प्रगत राज्यांचीच जास्त प्रगती झाली.

त्याचप्रमाणे राज्याच्या निव्वळ उत्पादनात झालेला बदलदेखील प्रादेशिक विषमता दाखविते. १९८०-८१ आणि १९९०-९१ हा आर्थिक सुधारणा पूर्वीचा काळ जसे आपण विचारात घेतला तरीदेखील प्रगत राज्यातील निव्वळ उत्पादन वाढीचा दर ५.२% एवढा होता. आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर पंजाब, महाराष्ट्र, हरियाणा, इत्यादी प्रगत राज्यांचा निव्वळ उत्पादनवाढीचा दर ६.३% एवढा १९९०-९१ ते १९९६-९७ या काळात होता. या उलट मागासलेली राज्ये जसे मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राज्यस्थान इत्यादी या राज्यांचा विकास, आर्थिक सुधारणा कार्यक्रमापूर्वी म्हणजेच (१९८०-८१ ते १९९०-९१) पर्यंत केवळ ४.९% एवढाच होता; परंतु सुधारणा कार्यक्रमानंतर म्हणजेच १९९०-९१ ते १९९६-९७ या काळात या दरात घट होऊन तो ३% एवढा झाला.

डॉ. एम. जे. कुरियन, नियोजन मंडळाचे सदस्य यांनी 'वायडनिंग रिजनल डिस्परेटिज इन इंडिया' (Widening Regional Disperities in India) या ग्रंथात असे नमूद केले आहे की, आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर गुंतवणुकीचे २/३ प्रस्ताव हे प्रगत राज्यासाठीच मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे अनेक वित्तीय संस्थांनीदेखील प्रगती राज्यांनाच मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य केले. याचाच अर्थ आर्थिक सुधारणा प्रक्रिया प्रगत राज्यांना अतिप्रगत करणारी होती, तर मागास राज्यांना मागास अवस्थेत ठेवणारी होती.

**जागतिकीकरणाच्या मर्यादा / तोटे / दोष (Limitations) :**

जागतिकीकरणाच्या मर्यादा किंवा तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) कर्जबाजारीपणात वाढ :** सन १९८० नंतरच्या काळात जगातील अनेक अविकसित देश कर्जबाजारी झाले. त्यांना जागतिक बँकेकडून कर्जे मोठ्या प्रमाणावर घ्यावी लागली. कर्जे मिळविताना आर्थिक पुनर्रचनेचा कार्यक्रम स्वीकारण्याची अट त्यांना मान्य करावी लागली. मेक्सिको, ब्राझील, चिली, अर्जेंटिना यासारख्या देशांना कर्जबाजारी व्हावे लागले. अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या कार्यक्रमामुळे त्यांना कर्जे घेणे भाग पडले. कर्जावरील व्याजापोटी त्यांना मोठी रक्कम भरावी लागली. परिणामी, या देशांचे नुकसान झाले.

**२) बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता प्रभाव :** अविकसित देशातील विविध क्षेत्रांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव वाढला. बँक व्यवसाय, विमा, माहिती-तंत्रज्ञान, दूरसंचार पर्यटन, जाहिराती, वैद्यकीय सेवा, लेखापरीक्षण इत्यादी सर्व क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी शिरकाव केला. मागील काही वर्षात अमेरिका, जपान व पश्चिम युरोपमधील

५००हून अधिक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जगभरात आपले वर्चस्व निर्माण केले आहे. जागतिक व्यापारातील फार मोठा हिस्सा त्यांच्याकडे केंद्रित झाला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार व जाहिरातबाजीद्वारे ग्राहकांच्या मनावर ठसा उमटविण्यात या कंपन्या यशस्वी होत आहेत. यामुळे या कंपन्यांची मक्तेदारी वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**३) नैसर्गिक संपत्तीचे शोषण :** जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून जगातील अनेक देशातील नैसर्गिक संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. जागतिकीकरणामुळे ५०% विषुववृत्तीय वनसंपदा संपुष्टात आली. यामुळे जैविक विविधताही धोक्यात आली आहे. विकसित देशांची लोकसंख्या कमी आहे; पण त्या तुलनेत ते ऊर्जेचा अधिक प्रमाणात उपभोग घेतात. तेथील उद्योगधंदे कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रिक ॲसिड, मिथेन वायू इत्यादी वायू वातावरणात सोडतात. बाहेर टाकला जाणारा औद्योगिक कचराही मोठ्या प्रमाणात राहतो. यामुळे नैसर्गिक संपत्ती आणि पर्यावरणाचे रक्षण या बाबींना महत्त्व देणे क्रमप्राप्त ठरत आहे.

**४) कृषी क्षेत्रावरील परिणाम :** जागतिकीकरणामुळे संविदा कधी वाढत आहे. खते, बी-बियाणे, कीटकनाशके यांच्या पुरवठ्याचे स्रोत स्वत:कडे ठेवून आणि दुसऱ्या बाजूला कृषी उत्पादनाच्या बाजारावर नियंत्रण प्रस्थापित करून बहुराष्ट्रीय कंपन्या कृषी क्षेत्राला प्रभावित करत आहेत. कंपन्यांनी सुचविलेल्या पिकांचे उत्पादन घेण्यासाठी व ते देखील तो भाव मान्य करण्यासाठी शेतकऱ्यांवर दबाव टाकला जात आहे. यामुळे देशाची अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णता नष्ट होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. याशिवाय, उती संवर्धन, जैविक तंत्रज्ञान, भांडवलाचा वाढता वापर इत्यादीमुळे कृषी क्षेत्राला धोका निर्माण झाला आहे.

**५) विकसनशील देशांचे नुकसान :** जागतिकीकरणाच्या प्रमाणाने विकसनशील देशांचे नुकसान होत आहे. औद्योगिक वस्तूंच्या आयातीवरील करात घट झाली. जागतिक व्यापारात वाढ झालेली असली तरी त्यातील अविकसित राष्ट्रांचा हिस्सा खूप कमी आहे. अविकसित देशातील वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात मिळणाऱ्या किमती घटत आहेत. याशिवाय, विकसित देशातील वस्तूंशी त्यांना स्पर्धा करणे कठीण जात आहे. तसेच पर्यावरण, बालमजुरी इत्यादी कारणे दाखवून विकसित देश अविकसित देशांचा माल नाकारतात. यामुळे निर्यातवृद्धी कशी करावयाची हा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

**६) सार्वजनिक खर्चात कपात :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा संबंध आंतरराष्ट्रीय चलननिधी आणि जागतिक बँक यांच्या आर्थिक संरचनात्मक कार्यक्रमाशी आहे. या कार्यक्रमात प्रामुख्याने सार्वजनिक खर्चात कपात करण्यावर भर दिला जातो. अर्थात्, जागतिकीकरणामुळे सरकारी खर्चात घट झाल्यास सरकारकडून गरीब वर्गाला



मिळणाऱ्या आर्थिक साहाय्यातही कपात करावी लागते. याचा विपरीत परिणाम देशातील गरीब लोकांवर होतो.

**७) खाजगी क्षेत्राचा विस्तार :** जागतिकीकरण करताना खाजगीकरणही केले जाते. यामुळे खाजगी क्षेत्राचा विस्तार होतो. अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांबरोबर वीजपुरवठा, पाणीपुरवठा यासारख्या आवश्यक क्षेत्रांचेही खाजगीकरण घडून येते. खाजगी क्षेत्राच्या वाढत्या सहभागामुळे सामान्य सेवा सवलतीच्या दराने उपलब्ध होत नाहीत. सार्वजनिक क्षेत्राचा संकोच होण्याचा फटका देशातील सर्वसामान्यांना बसतो.

**८) आर्थिक विषमतेत वाढ :** आर्थिक विषमतेतील वाढ हा जागतिकीकरणाचा आणखी एक तोटा मानता येईल. उच्चशिक्षित, कुशल व कार्यक्षम व्यक्तींना अधिक पगाराच्या नोकऱ्या मिळतात तर सामान्य व्यक्तींना न्यूनतम वेतनावर समाधान मानावे लागते. जागतिकीकरणाने श्रीमंतांची श्रीमंती आणखी वाढत असल्याने आर्थिक विषमता वाढत जाते.

**९) स्वदेशी उद्योगांच्या अस्तित्वाला धोका :** वैश्विकरणाची प्रक्रिया बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव वाढविते. या कंपन्यांच्या वस्तूंचा दर्जा उच्च असतो. शिवाय वस्तूंची किंमतही कमी असते. उच्च तंत्रज्ञान, जाहिरातबाजी इत्यादीमुळे या कंपन्या सरस ठरतात. स्वदेशी उद्योग अशा कंपन्यांशी मुकाबला करू शकत नाही. त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो.

**१०) वसाहतवादाचा नवा अवतार :** जागतिकीकरण म्हणजे वसाहतवादाचा नवीन अवतार आहे असे म्हटले जाते. १८व्या व १९व्या शतकात ब्रिटिश, डच व फ्रेंच कंपन्यांनी जे धोरण स्वीकारले तेच धोरण बहुराष्ट्रीय कंपन्या जागतिकीकरणाद्वारे राबवत आहेत. जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या वाढत्या प्रभावामुळे लोकशाही स्वीकारलेल्या देशांची स्वायत्तता धोक्यात येऊ शकते.

***

## अभ्यासासाठी प्रश्न

१) जागतिकीकरण म्हणजे काय ते सांगून, जागतिकीकरण भारताच्या दृष्टीने कसे फायदेशीर आहे, ते सांगा.

२) भारताला आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम का स्वीकारावा लागला ते सांगून हा कार्यक्रम स्वीकारल्यानंतर त्यांचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला ते सांगा.

३) आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा शेती, औद्योगिक क्षेत्रावर झालेला परिणाम सांगा.

४) टिपा लिहा.

अ) जागतिकीकरणाचा अर्थ ब) जागतिकीकरणाचे भारताच्या दृष्टीने फायदे
क) आर्थिक सुधारणेनंतर भारतीय अर्थव्यवस्था
ड) आर्थिक सुधारणा, बचत, गुंतवणूक

***